# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

page
03 Jul 20.

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज

https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# कोयनातीर नियतकालिक हे विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचे व्यासपीठ : याज्ञसेन पाटणकर

महाराष्ट्र न्यूज नेटवर्क

टण, दि.२ जुलै : महाविद्यालयाचे यनातीर हे नियतकालिक द्यार्थ्यांसाठी एक महत्वाचे व्यासपीठ हे. महाविद्यालयीन नियतकालिके द्यार्थ्यांच्या कल्पना, विचार आणि खनाला वाव देतात.

कोयनातीर नियतकालिक हे द्या या कलागुणांना वाव यासाठी व त्यांच्यातील सृजनशील खनाला वाव देण्यासाठीचे व्यासपीठ हे. असे मत कोयना एज्युकेशन सायटीचे संचालक याज्ञसेन पाटणकर नी व्यक्त केले. ते कोयना एज्युकेशन सायटीच्या बा. दे. कॉलेजच्या यनातीर या नियत कालिकाच्या काशन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून लत होते. तर अध्यक्षस्थानी कोयना ज्युकेशन सोसायटीचे संचालक जीव चव्हाण होते. बा. दे. कॉलेजचे चार्य डॉ. एस. डी. पवार, कोयनातीर नियतकालिकाचे मुख्य संपादक प्रा. डॉ. विनायक राऊत, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. एच. व्ही. काटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रकाशन समारंभाच्या सुरुवातीला डॉ. विनायक राऊत यांनी प्रास्ताविक केले त्यामध्ये त्यांनी अंकाची माहिती तसेच मुखपृष्ठ संकल्पना याबाबत थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर विभागीय संपादक यांचा सत्कार करण्यात आला व प्रमुख पाहुण्याच्या हस्ते अंकाचे प्रकाशन करण्यात आले. मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. एस.डी. पवार म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालय विविध उपक्रम राबवीत असते त्यामधील एक महत्वाचा उपक्रम म्हणजे कोयनातीर हे नियतकालिक होय.

यामध्ये विद्यार्थी लेखांच्या विविध कलागुणांच्या माध्यमातून अभिव्यक्त होत असतो. दरवर्षी आपल्या कॉलेजच्या



अंकाला विद्यापीठ नियतकालिक स्पर्धेमध्ये अनेक पारितोषिके मिळतात. यावर्षी सुद्धा आपण स्पर्धेत कुठेही कमी पडणार नाही असे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यानंतर कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात अंकामधील विविध लेखांबद्दल थोडक्यात चर्चा केली तसेच विद्यार्थ्यांनी लिहिले पाहिजे. आपले अनुभव कथन केले पाहिजेत वाचन केले पाहिजे त्याचबरोबर कोयनातीर हा अंक सोशल मीडियाद्वारे सुद्धा माजी विद्या व लोकांच्या पर्यंत पोहचला पाहिजे अ मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. एच. व्ही काटे यांनी आभार मानले तर डॉ श्रीनिवास पवार यांनी आपल्या ओघवत्य शैलीत सूत्र संचालनाची धुरा सांभाळली नियतकालिक प्रकाशनाच्या कार्यक्रमाला सर्व विभागीय संपादक, सर्व प्राध्याप तसेच प्रशासकीय सेवक वर्ग उपस्थि होता.